www.newsdanka.com

राष्ट्रवादाचा बुलंद आवाज

# न्यूज डंका महाराष्ट्र

मुंबई । पुणे । नाशिक जिल्ह्यात एकाच वेळी वितरित होणारे दैनिक

आर.एन.आय. रजिस्ट्रेश क्र. : MAHMAR/2022/83413

मुंबई | शुक्रवार, १० जुलै २०२६ >> वर्ष ५ >> अंक ६६ >> पाने ६ >> किंमत ५ रुपये | मुख्य संपादक : दिनेश कानजी



नेमार खेळणार की बूट टांगणार? >> पान..६

संपादकीय

अणुउर्जेतील अडथळ्यावर मात मोदी इज द बॉस >> पान..२

# ऑस्ट्रेलियातून भारतात युरेनियम आयातीचा मार्ग मोकळा

## पंतप्रधान मोदींच्या दौऱ्यादरम्यान भारत-ऑस्ट्रेलिया अणुऊर्जा कराराला नवी चालना

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

**भारताच्या ऊर्जा सुरक्षेला आणि स्वच्छ ऊर्जा अभियानाला मोठी चालना देणारा महत्त्वाचा निर्णय भारत आणि ऑस्ट्रेलियाने घेतला आहे. दोन्ही देशांनी ऊर्जा सुरक्षा करारावर स्वाक्षऱ्या केल्या असून, त्यामुळे ऑस्ट्रेलियातून भारतात शांततापूर्ण उद्देशांसाठी युरेनियम आयात करण्याचा मार्ग अधिकृतपणे खुला झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांच्या उपस्थितीत झालेल्या वार्षिक द्विपक्षीय शिखर परिषदेत या निर्णयाची घोषणा करण्यात आली.**



> "आज आम्ही अणुऊर्जा क्षेत्रातील एक महत्त्वाचा करार पूर्ण केला आहे. या करारामुळे ऑस्ट्रेलियातून भारताला युरेनियमचा पुरवठा सुरू होण्याचा मार्ग मोकळा होईल. त्यामुळे भारताच्या स्वच्छ ऊर्जा उद्दिष्टांना नवी ताकद मिळेल आणि ऊर्जा क्षेत्रातील सहकार्य अधिक दृढ होईल.
>
> ✦ पंतप्रधान नरेंद्र मोदी

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत भारत-ऑस्ट्रेलिया अणुऊर्जा सहकार्याला अंतिम मंजुरी मिळाली. या करारामुळे ऑस्ट्रेलियातून भारताला युरेनियम पुरवठ्याचा मार्ग अधिकृतपणे खुला झाला.
- करारानुसार ऑस्ट्रेलियातून मिळणारे युरेनियम केवळ शांततापूर्ण नागरी अणुऊर्जा प्रकल्पांसाठीच वापरले जाणार असून, संपूर्ण प्रक्रियेवर IAEA ची देखरेख असेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, "आज आम्ही अणुऊर्जा क्षेत्रातील एक महत्त्वाचा करार पूर्ण केला आहे. या करारामुळे ऑस्ट्रेलियातून भारताला युरेनियमचा पुरवठा सुरू होण्याचा मार्ग मोकळा होईल. त्यामुळे भारताच्या स्वच्छ ऊर्जा उद्दिष्टांना नवी ताकद मिळेल आणि ऊर्जा क्षेत्रातील सहकार्य अधिक दृढ होईल."

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात २०१५ मध्ये 'ऑस्ट्रेलिया-भारत अणु सहकार्य करार' झाला होता. मात्र, युरेनियम निर्यातीसाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय प्रक्रिया आणि सुरक्षा यंत्रणा पूर्ण होणे बाकी होते. आता दोन्ही देशांनी या सर्व प्रक्रियांना अंतिम स्वरूप दिले आहे. त्यामुळे ऑस्ट्रेलियातील युरेनियम भारताला निर्यात करण्याचा मार्ग अधिकृतपणे खुला झाला आहे. या करारानुसार, ऑस्ट्रेलियातून भारताला पुरवण्यात येणारे युरेनियम केवळ शांततापूर्ण अणुऊर्जा प्रकल्पांसाठीच वापरले जाईल. या संपूर्ण प्रक्रियेवर आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्था (IAEA) लक्ष ठेवणार असून, तिच्या सुरक्षा आणि देखरेखीच्या नियमांचे पालन करणे भारतासाठी बंधनकारक असेल.

>> पान...५ वर

# शिंदेंच्या दालनात बैठक घेऊन पवारांनी गद्दारांना प्रतिष्ठा दिली!






टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्यानंतर त्यांच्या दालनात पक्षाच्या आमदारांची बैठक घेतली. यामुळे राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे.

शरद पवारांचा पक्ष सरकारमध्ये येणार का अशा चर्चा होत असून याच पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीमधील धुसफूस चव्हाट्यावर आली आहे. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी या सर्व घडामोडींवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अशा कृतीमुळे मोठ्या नेत्याच्या विश्वासार्हतेवर परिणाम होतो, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

"शरद पवार हे नक्कीच मोठे आणि आदरणीय नेते आहेत. मात्र, ज्या गद्दारांनी महाविकास आघाडीचे सरकार पाडले, अशा व्यक्तीच्या छताखाली जाऊन पक्षाची बैठक घेणे योग्य नाही. अशा कृतीमुळे मोठ्या नेत्याची विश्वासार्हता कमी होते," अशा शब्दांत संजय राऊत यांनी शरद पवारांबद्दलची नाराजी व्यक्त केली. ते पुढे म्हणाले की, "एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्राच्या राजकारणाला गद्दारी आणि भ्रष्टाचाराची कीड, वाळवी लावली. अशा व्यक्तीच्या कार्यालयात जाऊन बैठक घेण्याची गरज नव्हती. विधानभवन ओस पडले होते का? समोर राष्ट्रवादी भवन आहे, वाय. बी. चव्हाण प्रतिष्ठान आहे. बैठक घेण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध होते."

राऊत यांनी स्पष्ट केले की, "हे आमच्या पक्षातील निष्ठावंत कार्यकर्त्यांचेही मत आहे. आम्ही कधीही गद्दारांच्या ठिकाणी जाऊन आमच्या पक्षाच्या बैठका घेणार नाही. आमचे मन एवढे मोठे नाही आणि आम्ही असे कधी करणारही नाही.

>> पान...५ वर

# भारत-पाक युद्ध रोखल्याचा डोनाल्ड ट्रम्प यांचा पुन्हा दावा



टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भारत-पाकिस्तान संघर्षाबाबत मोठा दावा करत, दोन्ही देशांमधील युद्ध अणुयुद्धात परिवर्तित होण्याच्या उंबरठ्यावर पोहोचले होते आणि आपण हस्तक्षेप करून ते थांबवले, असे म्हटले. ब्रिटनमधील आरएएफ माइल्डेनहॉल येथे पत्रकारांशी संवाद साधताना ट्रम्प यांनी हा दावा केला. मात्र भारताने यापूर्वी अनेकदा अशा दाव्यांचे खंडन करत युद्धविराम हा भारत आणि पाकिस्तान यांच्यातील थेट लष्करी चर्चेचा परिणाम असल्याचे स्पष्ट केले आहे.


ट्रम्प म्हणाले, "भारत आणि पाकिस्तानमध्ये भीषण युद्ध सुरू होते. ते जवळपास आठवडाभर चालले होते. त्या संघर्षात ११ विमाने पाडली गेली होती आणि परिस्थिती अणुयुद्धापर्यंत जाऊ शकली असती." त्यांनी दावा केला की, दोन्ही देशांसोबत व्यापार करारांचा मुद्दा उपस्थित करून त्यांनी संघर्ष थांबवण्यासाठी दबाव आणला.

ट्रम्प यांनी पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी आपले आभार मानल्याचाही पुनरुच्चार केला.

>> पान...३ वर

# भारतासाठी महत्त्वाच्या असलेल्या चाबहार बंदरावर अमेरिकेचा हल्ला

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला "यापुढे परिस्थिती आणखी गंभीर होईल" असा इशारा दिल्यानंतर अवघ्या काही तासांत पुन्हा मोठ्या प्रमाणावर हवाई हल्ले चढवले. या कारवाईत भारतासाठी सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे असलेल्या चाबहार बंदरालाही लक्ष्य करण्यात आल्याने भारताच्या व्यापार आणि प्रादेशिक हितसंबंधांबाबत चिंता वाढली आहे.

अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने (CENTCOM) सांगितले की, होर्मुझ सामुद्रधुनीत व्यापारी जहाजांवर झालेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेचा उद्देश इराणची समुद्री वाहतुकीला धोका निर्माण करण्याची क्षमता कमकुवत करणे हा असल्याचे अमेरिकेने स्पष्ट केले आहे.


इराणी माध्यमांच्या माहितीनुसार, अमेरिकेच्या हल्ल्यात चाबहारमधील शहीद बेहेश्ती बंदर, कलांतरी बंदर आणि मेरीटाइम ट्रॅफिक कंट्रोल टॉवरचे नुकसान झाले. शहरात सलग स्फोट झाले, अनेक भागांमध्ये वीजपुरवठा खंडित झाला आणि स्फोटांचे तुकडे एका रुग्णालयापर्यंत पोहोचल्याचेही वृत्त आहे. याशिवाय बंदर अब्बास, सिरीक, बुशेहर, जस्क, अबू मुसा बेट आणि इराणशहर विमानतळासह इराणच्या अनेक सामरिक ठिकाणांवरही हल्ले करण्यात आले.

### भारतासाठी चाबहारचे महत्त्व काय?

चाबहार बंदर भारताच्या परराष्ट्र आणि व्यापार धोरणातील अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प मानला जातो. पाकिस्तानला वळसा घालून अफगाणिस्तान, मध्य आशिया आणि रशियापर्यंत पोहोचण्यासाठी भारतासाठी हा महत्त्वाचा समुद्री मार्ग आहे.

>> पान...३ वर

# रेल्वेच्या फर्स्ट क्लासच्या डब्ब्याला 'हनीमून बेडरूम'चा लूक




टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

सोशल मीडियावर 'सुहागरात एक्सप्रेस' म्हणून व्हायरल झालेल्या नंदीग्राम एक्सप्रेसच्या एका व्हिडिओनंतर भारतीय रेल्वे प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई केली आहे. नवविवाहित जोडप्यासाठी फर्स्ट एसी डब्ब्याला फुले, फुगे, गुलाबाच्या पाकळ्या आणि फेरी लाईट्सने बेडरूमसारखा सजवण्यात आल्याचा व्हिडिओ समोर आल्यानंतर हा प्रकार रेल्वेच्या सुरक्षा नियमांचे गंभीर उल्लंघन असल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी दक्षिण मध्य रेल्वेने संबंधित तिकीट तपासनीस (टीसी/टीटीई) याला निलंबित केले असून, सजावट करणाऱ्या डेकोरेटरविरोधातही रेल्वे कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

>> पान...५ वर


## लॉर्ड्स मार्कचा शेअर बाजारात नवा अध्याय

# लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीजचे आज BSE वर लिस्टिंग!

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com



लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज लिमिटेडचे बॉम्बे स्टॉक एक्सचेंजमध्ये उद्या शुक्रवार, १० जुलैपासून लिस्टींग होत आहे. नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्यूनलने (NCLT) मंजूर केलेल्या आराखड्यानुसार क्रॅटोस एनर्जी या कंपनीचे सेबीच्या शिक्कामोर्तबानंतर लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेडमध्ये रिव्हर्स मर्जर झाले. ही कंपनी 'लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज लिमिटेड' या नावाने लिस्ट होत आहे. सच्चिदानंद उपाध्याय कंपनीचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक असून नामांकीत गुंतवणूकदार, उद्योजक प्रशांत कारुळकर यांनी कंपनीत मोठी गुंतवणूक केली आहे. क्रिकेटपटू राहुल द्रविड कंपनीचे ब्रँड अँबेसिडर आहेत. हेल्थकेअर आणि फार्मास्युटिकल क्षेत्रात लॉर्ड्स मार्कने एआयच्या मदतीने एक नवी क्रांती आणली आहे. रोग निदानाची एकूण संकल्पाच पूर्णपणे बदलून टाकली आहे. ज्याचा रुग्णांना प्रचंड लाभ होतो आहे. कंपनी १९७७ पासून कार्यरत आहे. आरोग्य परिक्षणासाठी कंपनीने विकसित केलेले 'डोझी' हे अत्यंत उपयुक्त







उपकरण लोकप्रिय झाले आहे. शरीराला कोणतेही सेन्सर किंवा वायर्स न जोडता, रुग्णाच्या गादी खाली ठेवलेल्या सेन्सरशीटच्या मदतीने हदयाचे ठोके, श्वास, रक्तदाब, झोपेची गुणवत्ता यावर लक्ष ठेवले जाते. या डेटाचे एआयद्वारे विश्लेषण केले जाते. रुग्णाची तब्येत बिघडली तर 'अर्ली वॉर्निंग अलर्ट' येतो. सरकारी उपक्रम CMET सोबत लॉर्ड मार्कने AI-आधारित ब्रेस्ट कॅन्सर डिटेक्शन डिव्हाइससाठी हात मिळवणी केलेली आहे.

आयएसओ-प्रमाणित रॅपिड टेस्टिंग किट्स, बायोकेमिस्ट्री रिएजंट्स आणि एनिमियासाठी एआय-आधारित सिकलसेल चाचणी यामध्ये कंपनीने विशेष प्राविण्य मिळवलेले आहेत. रक्त चाचण्यांसाठी रक्त काढण्याची गरजच नाही आणि तज्ज्ञांचीही गरज नाही. घर बसल्या लोक रक्त चाचणी करू शकतील, रोग निदान करू शकतील अशी कंपनीची विविध उत्पादने आहेत.



> 'सच्चिदानंद हे अत्यंत यशस्वी उद्योजक आहेत. आमची केमिस्ट्रीही अत्यंत उत्तम आहे. सच्चिदानंद यांच्या अनुभवाचा फायदा निश्चितपणे गुंतवणुकदारांना होणार आहे. वारी एनर्जीज लिमिटेड, स्मार्टवर्क्स कोवर्किंग स्पेसर्स लिमिटेड, डेन्टा रेमेडीज लिमिटेड, आनंद राठी वेल्थ लिमिटेड, डेनेक्स इंटरनॅशनल, एक्मे फिनट्रेड (इंडिया) लिमिटेड इत्यादी कंपन्यानंतर लॉर्ड मार्कच्या निमित्ताने मी गुंतवणूकदार म्हणून एका चांगल्या कंपनीशी जोडला गेलो आहे, ही माझ्यासाठी निश्चितपणे आनंदाची बाब आहे.' अशी प्रतिक्रिया प्रशांत कारुळकर यांनी या निमित्त दिलेली आहे.
>
> ✦ प्रशांत कारुळकर, उद्योजक